**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ ▪ अंक २५५ ▪ बुधवार ९ जुलै २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या हालचाली सुरू

**मुंबई । वृत्तसंस्था** – उत्तराखंडनंतर आता महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू होण्याची शक्यता असून, शासकीय पातळीवर कशा हालचाली सुरू झाल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या अधिवेशनातच याबाबत माहिती दिली होती. समान नागरी कायद्यासंदर्भात ७ जणांची समिती नेमण्यात येत असून सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून सात जणांची समिती घोषित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत आज समान नागरी कायद्याबाबत पुन्हा एकदा घोषणा केली, ही समिती येत्या सहा महिन्यात अभ्यास करून अहवाल सादर करणार आहे. समान नागरी कायद्याचा मसूदा येत्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. दोन्ही सभागृहासमोर हा मसुदा आल्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर करण्यासाठीचे सोपस्कार पार पडतील.

२०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्यासंदर्भात आणि अंमलबजावणीसाठी समिती घोषित केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री यांनी ▪ पान ४ वर

### उत्तराखंड ठरले पहिले राज्य

उत्तराखंडमध्ये २७ जानेवारी २०२५ रोजी समान नागरी कायदा लागू करण्यात आला. मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी याबाबत घोषणा केली. समान नागरी कायदा लागू करणारे उत्तराखंड हे देशातील पहिले राज्य ठरले. गतवर्षी ७ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड विधानसभेने समान नागरी कायदा मंजूर केला होता. १८ ऑक्टोबर २०२४ रोजी याविषयीच्या समितीने समान नागरी कायद्याचा अहवाल दिला. त्यानंतर हा कायदा लागू करण्यात आला. आता, महाराष्ट्रातही हा कायदा लागू करण्याची घोषणा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात होण्याची शक्यता आहे.

## भगूर येथे मावा व सुगंधित तंबाखू जप्त

### एलसीबीच्या कारवाईत एकाला अटक । सव्वा लाखाचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शेवगाव तालुक्यातील भगूर येथे बेकायदेशीरपणे शरीरास अपायकारक सुगंधित तंबाखू व मावा तयार करून विक्री करणाऱ्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने पहाटेच्या सुमारास छापा टाकून १ लाख २२ हजार ८२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे, तर मुख्य सूत्रधार फरार झाला आहे.

दिनांक ९ जुलै रोजी पहाटे, भगूर गावच्या शिवारात नितीन ज्ञानदेव पुरणाळे हा आपल्या घरामागील पत्र्याच्या शेडमध्ये मशीनच्या ▪ पान ४ वर

### कारवाईत यांचा सहभाग

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक संदीप दरवडे, अंमलदार गणेश लोंढे, बाळासाहेब नागरगोजे, प्रकाश मांडगे, मनोज साखरे, भाग्यश्री भिटे आणि चालक भगवान धुळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.




### जीकेएन सेंटरमधील कामगाराच्या आत्महत्येप्रकरणी

## कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यासह चारजणांविरोधात गुन्हा दाखल

### अहिल्यानगरच्या एमआयडीसी येथील घटना । जीकेएन कंपनीतील प्लंट हेड पुरूषोत्तम ऋषी फरार । तिघे अटकेत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** एमआयडीसी येथील जी.के.एन सेंटर प्रा. लि. कंपनीतील वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यापैकी तिघांना पोलिसांनी अटक केली आहे.



सचिन भदर्गे

सचिन आदिनाथ भदर्गे ( वय ४७ ,रा. प्लॉट क्र. २, संचारनगर, लेखानगर, माऊली मंदिरजवळ, सावेडी अहिल्यानगर) अशी आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सचिन भदर्गे हे गेल्या १९९७ पासून जी.के.एन. सेंटर या कंपनीत मशिन ऑपरेटर या पदावर काम करत होते. कंपनीत काम करताना गेल्या ४-५ महिन्यांपासून मानसिक त्रास असल्याने चिंताग्रस्त होते. याबाबत त्यांची पत्नी कल्पना यांनी त्यांना वारंवार विचारना केली असता कंपनीमध्ये वरिष्ठांकडून मानसिक त्रास दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. सदरचा त्रास हा कंपनीतील समीर शेवाळे तसेच कंपनीचे प्लान्ट हेड पुरुषोत्तम ऋषी आणि कंपनीतील इतर वरिष्ठ हे नेहमी मला वारंवार टोमने मारुन अपमानस्पद वागणुक देत असून कंपनीतून काढून टाकू अशी धमकी देत असल्याचे त्यांनी कुटूंबीयांना सांगितले. तसेच त्यांनी कंपनी अंतर्गत कामगार संघटनेचे सेक्रेटरी बाबासाहेब अर्जून निर्मळ, उपाध्यक्ष विठ्ठल हंडोरे यांनाही सांगितला. परंतु त्यांनीही त्याकडे दुर्लक्ष करुन त्यांच्याकडूनही त्रास होऊन अशी वागणुक दिली गेली. आत्महत्येपुर्वी सचिन भदर्गे यांनी चिट्ठी लिहून ठेवली होती. त्या चिठ्ठीमध्ये आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्यांच्या नावाचा समावेश होता त्यानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या त्रासाला कंटाळून सचिन भदर्गे यांनी कंपनीतच दि. ७ जून रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यानुसार कल्पना सचिन भदर्गे यांच्या फिर्यादीवरुन समीर शेवाळे, पुरुषोत्तम ऋषी, बाबासाहेब निर्मळ, विठ्ठल हंडोरे यांच्या विरुध्द व तसेच इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस उपाधिक्षक शिरीष वमने, सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार राकेश खेडकर, संदीप पवार, शैलेश रोहकले यांच्या पथकाने बाबासाहेब निर्मळ, विठ्ठल हंडोरे, समीर शेवाळे या तिघांना अटक केली आहे.

### तर बाऊंसरचा सहारा कशासाठी?

सचिन भदर्गे यांच्या आत्महत्येनंतर अडचणीत आलेल्या कंपनीतील अधिकारी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी बाऊंसरचा सहारा घेतला आहे. याचाच अर्थ कंपनीतील अधिकारी व संघटनेचे पदाधिकारी सचिन भदर्गे यांना त्रास देत असल्याचे सिद्ध होत आहे.

## राष्ट्रपुरुषांविषयी आक्षेपार्ह मजकूर पसरवणारा १२ तासांत गजाआड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** फेसबुकवर राष्ट्रपुरुषांविषयी आक्षेपार्ह आणि बदनामीकारक मजकूर प्रसारित करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला पाथर्डी पोलिसांनी अवघ्या १२ तासांच्या आत ताब्यात घेतले आहे. सूरज बाबासाहेब वांढेकर (वय ३६) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दिनांक ८ जुलै रोजी फेसबुकवर महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल झाली होती. या घटनेची गांभीर्याने दखल घेत पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता () २०२३ च्या कलम ३५३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ▪ पान ४ वर

### वैयक्तिक वादातून दुसऱ्याचे फेसबुक वापरून केला प्रकार

अधिक चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी सुरज याचा देविदास शिरसाठ नामक व्यक्तीशी वैयक्तिक वाद होता. देविदासला अडचणीत आणण्याच्या उद्देशाने सुरजने २६ जून रोजी त्याचे फेसबुक अकाउंट बेकायदेशीरपणे ॲक्सेस केले आणि त्यावरून ही वादग्रस्त पोस्ट व्हायरल केली.

### पोलिसांचे आवाहन

आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहेत. नागरिकांनी या घटनेबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता बाळगावी आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## श्री क्षेत्र शिर्डी ते पंढरपूर पायी पालखी सोहळा; श्री साई संस्थान आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने भव्य सुरुवात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शिर्डी –** श्री क्षेत्र शिर्डी ते श्री क्षेत्र पंढरपूर या भव्य पवित्र पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी काशिकानंदजी महाराज परमहंस आणि श्री गुरुस्वामी सच्चिदानंदजी महाराज परमहंस यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य सोहळा संपन्न होत आहे. सर्व भक्तगण या भक्तीमय प्रवासात मोठ्या संख्येने सहभागी होऊन सेवेचा आणि आनंदाचा लाभ घेत असतात आज श्री सदर पालखी सोहळ्याचे श्री साई ज्ञानेश्वर महाराज मंदिर, परमहंस आश्रम, निमगाव येथून पूजन व आरती करत प्रस्थान झाले व श्री साईबाबा मंदिर शेजारील





शताब्दी मंडप येथे श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पालखीचे पूजन व आरती करत भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.

सदर पालखी सोहळा गुरुवार दि. ०९/०७/२०२६ ते रविवार दि. २६/०७/२०२६. पर्यंत होणार असून श्री साईबाबा संस्थान व शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने पालखी सोहळ्यासाठी मोठे सहकार्य लाभत असल्याने महंत काशिकानंदजी महाराज यांनी त्यांचे आभार मानले तसेच यापुढील काळात देखील असेच सहकार्य ह्या पालखी सोहळ्यासाठी अविरत लाभो अशी साई चरणी ▪ पान ४ वर

## माळीवाडा वेशीला संरक्षण देण्याचे संभाजीनगर उच्च न्यायालयाचे आदेश

### कावरे यांच्या याचिकेवर सुनावणीदरम्यान निर्देश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील माळीवाडा वेशीचे संरक्षण करावे असे निर्देश छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिले आहेत त्याबद्दल माळीवाडा वेस या ठिकाणी महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच पेढे वाटून ,फटाके फोडून जल्लोष करण्यात आला यावेळी शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम ,जेष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे ,गटनेते दत्तात्रय कावरे ,विक्रम राठोड ,परेश लोखंडे ,बहिरनाथ वाकळे , चंद्रकांत ताठे ,शिवाजी जाधव ,नितीन भुतारे ,बाळासाहेब पुंड ,अनिल चेडे ,बाबासाहेब घोडके ,विनायक इंगळे ,फारूक शेख ,पियुष कोथिंबिरे ,घनश्याम घोलप ,संकेत तावरे ,पंकज मेहेर आदींसह परिसरातील नागरिक



मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना गटनेते दत्तात्रय कावरे यांनी जनहित याचिका दाखल केली होती.

## शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एल्गार

### सामूहिक रजा टाकून शिक्षक रस्त्यावर; टीईटी, पदोन्नती, संचमान्यता व बीएलओ सक्तीविरोधात धरणे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कार्यरत शिक्षकांवर लादण्यात आलेली टीईटीची अनिवार्यता, पदोन्नती प्रक्रियेतील अन्यायकारक अटी, संचमान्यतेचे जाचक धोरण, बीएलओच्या अशैक्षणिक कामाची सक्ती तसेच इतर शिक्षकविरोधी निर्णयांविरोधात अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनासाठी जिल्ह्यातील शिक्षकांनी सामूहिक रजा टाकून मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.




जिल्हाधिकारी कार्यालया समोर करण्यात आलेल्या आंदोलनाने संपूर्ण परिसर शिक्षक, शिक्षकेतरांच्या घोषणांनी दणाणला. या आंदोलनास राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. आंदोलनात समन्वय समितीचे अध्यक्ष सुनिल पंडित, सचिव आप्पासाहेब शिंदे, शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, बबन गाडेकर, दत्तात्रय कुलट, प्रकाश नांगरे, संतोष दुसुंगे, नारायण पिसे, ज्ञानदेव बेरड, सचिन झगडे, अमोल ठाणगे, प्रसाद शिंदे, मनिषा वाकचौरे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विलास पेद्राम आदींसह शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ▪ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### गणेश बनकर यांची विश्व सनातन धर्म सूर्य सेनेच्या प्रदेश संघटन सचिवपदी नियुक्ती



अहिल्यानगर- राष्ट्र उभारणीच्या कार्यात युवकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी कार्यरत असलेल्या विश्व सनातन धर्म सूर्य सेनेच्या प्रदेश संघटन सचिवपदी अहिल्यानगर येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश विठ्ठल बनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, संघटनात्मक आणि जनसंपर्क क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक सैनी यांच्या नेतृत्वाखाली तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक महासंघाचे उपसरसंघचालक संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली. समाजहिताची जाणीव, युवकांना विधायक दिशेने प्रेरित करण्याची भूमिका आणि विविध सामाजिक उपक्रमांमधील सातत्यपूर्ण सहभाग या बाबींचा विचार करून बनकर यांची प्रदेश संघटन सचिवपदी निवड करण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.गणेश बनकर हे सध्या भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असून सामाजिक क्षेत्रातही त्यांची सक्रिय ओळख आहे. तसेच ते अखिल भारतीय माळी महासंघात ज्येष्ठ पदाधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून युवकांना सकारात्मक दिशा देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. समाजातील उपेक्षित, वंचित आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ते राजकीय आणि सामाजिक माध्यमातून सक्रियपणे प्रयत्नशील असल्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली आहे. विश्व सनातन धर्म सूर्य सेना ही युवकांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी, भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान आणि संघटनशक्ती निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. या पार्श्वभूमीवर प्रदेश संघटन सचिव म्हणून गणेश बनकर यांच्यावर संघटनेच्या विस्तारासह युवकांमध्ये वैचारिक आणि सामाजिक जागृती निर्माण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### डोंगरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव

अहिल्यानगर - यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त शहरात झालेल्या धनगर समाजाच्या मेळाव्यात डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी अशोक सुर्यवंशी, प्राचार्य तुळशिराम भोजने, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, सरचिटणीस अजय जाडकर, मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर आदी उपस्थित होते.

### हिंदू धर्म रक्षक बाळनाथ गडाचे महंत संत चरणरज छगन महाराज मालुसरे यांचे निधन



अहिल्यानगर - नगर - पाथर्डी रोडवरील कौडगाव जवळ असलेल्या बाळनाथ गड येथील महंत संत चरणरज छगन महाराज मालुसरे यांचे आज बुधवार दिनांक ८ जुलै रोजी दुपारी १२ वाजून १० मिनिटांनी दुःखद निधन झाले. ते ८० वर्षांचे होते.
स्वर्गीय छगन महाराज यांच्या निधनाची वार्ता समजताच जिल्ह्यातून अनेक भाविक त्यांच्या अंत्यदर्शनासाठी बाळनाथ गड येथे गर्दी करीत आहेत. आज सायंकाळी ५ वाजता बाळनाथ गडावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत. छगन महाराज हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. या आजारपणातच आज दुपारी त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनामुळे भाविकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

## वारी ही अंतर्मन जागवणारी यात्रा - महापौर ज्योती गाडे

### अर्बन बँक कॉलनीत कन्हेरे – पंढरपूर पायी दिंडीचे स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वारी म्हटलं की डोळ्या समोर हजारो वारकऱ्यांचे अखंड चालणं उभे राहत, टाळ – मृदुंगांचा नाद आणि विठ्ठल नामाचा गजर होत असतो पंढरीची वारी ही महाराष्ट्राची शेकडो वर्षाची आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा आहे. वारी म्हणजे विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ असते. ही केवळ धार्मिक यात्रा नसते तर वारकऱ्यांना वर्षभर जगवण्याची ऊर्जा, शिस्त आणि जीवन मूल्यांची प्रेरणा देणारा संस्कार असतो.वारी ही अंतर्मन जागवणारी यात्रा आहे. असे प्रतिपादन अहिल्यानगर मनपा चे महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील श्रीक्षेत्र कन्हेरे ते पंढरपूर या पायी पहिल्याच दिंडीचे आगमन अहिल्यानगर शहरात अर्बन बँक कॉलनीत झाले. जिव्हाळेश्वर महादेव रथाचे स्वागत सौ.गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिंडी चालक हभप माधव महाराज पाटील, माजी सभापती पाटील साहेब, भारत बाप्पू, नगरसेवक निखिल वारे, योगीराज गाडे,भैय्या गंधे माजी नगरसेविका संगीता खरमाळे, मनपाचे शहर अभियंता मनोज पारखे, वैशाली पारखे,संदीप यादव, प्रवीण डोक्रस,राहुल जोशी, अजय घोलप, विनय वाखुरे, सचिन गाडे,शुभांगी निंबाळकर,मान्यवर उपस्थित होते. या पायी दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे हरिहरेश्वर महादेव व विठोबाची भेट या ठिकाणी होते.दिंडी चालक हभप माधव महाराज पाटील यांचा सन्मान आदिनाथ जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अभिजीत जोशी, प्रज्ञा जोशी, भार्गव जोशी व कॉलनीतील मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.यावेळी दिंडीतील वारकऱ्यांनी भारुडाचा कार्यक्रम सादर केला. हभप अभिजीत जोशी म्हणाले आषाढी वारीही समता,भक्ती व सामाजिक ऐक्याचा उत्सव असतो. परमेश्वरावर अटळ श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचे प्रतीक म्हणजे ही वारी असते. वारीत कोणी मोठा किंवा लहान नसतो, पैशापेक्षा माणुसकीला जास्त महत्त्व असते.असे श्री. जोशी म्हणाले. यावर्षी २०० ते २५० वारकरी दिंडीत सहभागी झाले होते. या सर्वांना कॉलनीच्या वतीने अल्पोपहार देण्यात आला.शेवटी जोशी परिवाराच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

## अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीला वेग

### टाकळी ढोकेश्वर विविध कार्यकारी सोसायटीचा ठराव सीताराम खिलारी यांच्या नावाने एकमताने मंजूर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**टाकळी ढोकेश्वर–** अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीची धामधूम सुरू असून, उमेदवारांना पाठिंबा देण्यासाठी विविध कार्यकारी सहकारी संस्थांमध्ये ठराव मंजूर करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. या पार्श्वभूमीवर टाकळी ढोकेश्वर येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सीताराम (सर) खिलारी यांच्या नावाने पाठिंब्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

ठराव मंजूर करण्याची अंतिम मुदत १६ जुलै असून, त्यानुसार आयोजित बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या ठरावाचे सूचक विलास रामदास झावरे तर अनुमोदक मल्हारी गणपत धुमाळ होते. ठरावाची संपूर्ण प्रक्रिया सोसायटीचे सचिव विजय गायकवाड यांनी पार पाडली.

बैठकीस ज्येष्ठ कार्यकर्ते बबनराव पायमोडे, चेअरमन नारायण यशवंत झावरे, व्हाईस चेअरमन मोहन शंकर रांधवन, संचालक शिवाजी काशिनाथ खिलारी, जयसिंग पाटील झावरे, बबन सावळेराम पायमोडे, विलास रामदास झावरे, मल्हारी गणपत धुमाळ, महेश गोवर्धन पाटील, श्रावण गायकवाड, बबन बांडे, दौलत जेजुरकर तसेच संचालिका अलका बांडे व सुंदराबाई गोरडे उपस्थित होत्या.

उपस्थित सर्व संचालकांनी चर्चेनंतर सीताराम (सर) खिलारी यांच्या नावाला एकमुखी पाठिंबा दर्शवत ठराव मंजूर केला. या निर्णयामुळे जिल्हा सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीतील राजकीय व सहकारी क्षेत्रातील घडामोडींना अधिक वेग मिळाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

## भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

### । ३९ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले
### । गुणवंतांचा छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलने पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी ) आणि पूर्व माध्यमिक (इयत्ता आठवी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. या दोन्ही परीक्षांमध्ये एकूण ३९ विद्यार्थ्यांनी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.
या उल्लेखनीय यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या प्रमुख छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक कैलास साबळे, उपमुख्याध्यापक निलेश भालेराव, पर्यवेक्षक नीलिमा शिंदे, रेणुका परदेशी व पाटील यांच्यासह मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना छायाताई फिरोदिया यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शैक्षणिक गुणवत्तेत सातत्य राखण्याचे आवाहन केले. शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाची पहिली पायरी असून, याच जिद्दीने आणि सातत्याने अभ्यास करत भविष्यातील मोठ्या स्पर्धा परीक्षांसाठी स्वतःला तयार करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता पाचवीच्या २० विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. यामध्ये आनंदी दहातोंडे , समर्थ कवाष्टे , स्वराज कार्ले, ओवी बडवे, सत्यजीत फुलसौंदर, सात्विक काळे, कृष्णवीर जगदाळे, पृथ्वीराज कदम, स्वरा कराळे, शर्वरी जोशी, आरुषी जाधव, ध्रुमिल चांडवले, सर्वेश रांधवन, सुरज डावखर, हिमांशू सोळुंके, दूर्वा निमसे, श्रावणी पानकडे, अक्षरा काळे, तेजश्री काटे, यशराज गिते या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या विद्यार्थ्यांना वैशाली मेहेर, अतुल बोरुडे, बाळासाहेब पालवे, शितल डिमळे, अपर्णा कमलकर, मंजुषा शिवगुंडे, मीनाताई कोकाटे आणि सविता जासुद यांनी मार्गदर्शन केले.

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता आठवीच्या १९ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. यामध्ये गिरिजा तनपुरे , इंदिरा देवकर, अतुल कराळे, राजनंदनी जाधव, सुजल घालमे, राघव ठिपसे, विक्रांत साळुंके, विनीत कदम, आयुष भोंडवे, अर्जुन दिघे, मल्हार डोंगरे, सार्थक अस्तगावकर, अविष्कार घोडके, अथर्व आमले, धर्मराज खोले, विराट भोसले, ओंकार शिंदे, अनन्या मिसाळ, विश्वेश गायकवाड या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या विद्यार्थ्यांना शैला औटी, राजलक्ष्मी कुलकर्णी, अतुल पटवा, शिल्पा नगरकर, अंजली गोले, सुलभा कुलकर्णी, वैभव पडोळे आणि सुषमा मुदगल यांचे मार्गदर्शन लाभले.

## पैठणवर वरुणराजाची दमदार कृपा; मुसळधार पावसाने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** अनेक दिवसांच्या कडक उकाड्यानंतर अखेर मंगळवारी पहाटे पैठण तालुक्यावर वरुणराजाने दमदार हजेरी लावली. रात्रीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण तालुक्याला मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांसह शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला, तर उष्णतेच्या झळांनी त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

या पावसामुळे शहरातील प्रमुख रस्ते तसेच सखल भागातील काही ठिकाणी पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. ग्रामीण भागातही पावसाचे उत्साहात स्वागत करण्यात आले असून सर्वत्र निसर्ग पुन्हा एकदा बहरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

खरीप हंगामाच्या दृष्टीने हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. बाजरी, मका, तूर, कापूस, सोयाबीन आदी पिकांसाठी हा पाऊस जीवनदायी ठरणार असून आधीच पेरणी झालेल्या शेतांतील पिकांना नवसंजीवनी मिळणार आहे. अनेक ठिकाणी पावसाअभावी रखडलेल्या पेरण्यांनाही आता वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या पाणीटंचाईवरही या पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विहिरी, शेततळी व लहान जलसाठ्यांमध्ये पाण्याची आवक सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तविला असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.




अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर इरिकेशन मशीद येथून लायबा इंटरनॅशनल हज उमरा टुर्स तर्फे दि.१० रोजी ५० जनाचा ग्रुप सौदी येथे उमरासाठी रवाना. (छाया– जाकीर शेख)

## ‘निरोगी आरोग्याचा कानमंत्र घेऊन महिलांचा ‘हरित शहर’चा संकल्प



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


**अहिल्यानगर–** महिलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक व्हावी आणि प्रत्येक घरातून हरित शहराच्या संकल्पनेला बळ मिळावे, या उद्देशाने प्रयास दादी-नानी ग्रुपने महापालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या ‘हरित शहर’ अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमात महिला सदस्यांना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वतीने विविध देशी वृक्षांची रोपे वितरित करण्यात आली. महिलांनी आपल्या घराच्या अंगणात, परिसरात आणि उपलब्ध जागेत वृक्षलागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

याच कार्यक्रमात महिलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी निसर्गोपचार, योग, संतुलित आहार आणि मानसिक स्वास्थ्य याविषयी विशेष मार्गदर्शन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैली या दोन्हींचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम उपस्थित महिलांसाठी प्रेरणादायी ठरला.

निसर्गोपचार तज्ज्ञ हेमा सेलोत यांनी ‘आहार, व्यायाम आणि निरोगी आरोग्य’ या विषयावर अत्यंत मार्गदर्शक व्याख्यान दिले. त्यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या जीवनात नैराश्य, तणाव आणि मानसिक अस्वस्थता ही अनेक गंभीर आजारांची प्रमुख कारणे बनत आहेत. या समस्यांवर औषधांपेक्षा सकारात्मक विचार, नियमित योग, ध्यान आणि शिस्तबद्ध जीवनशैली हा अधिक प्रभावी उपाय आहे.

त्या म्हणाल्या, ‘‘महिलांनी प्रथम स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. दिवसाची सुरुवात सकारात्मक विचारांनी, योगाभ्यासाने आणि प्राणायामाने झाली तर संपूर्ण दिवस उत्साही राहतो. सात्विक, संतुलित आणि पौष्टिक आहारामुळे अनेक आजारांपासून संरक्षण मिळते. ऋतूनुसार उपलब्ध फळे, भाज्या आणि नैसर्गिक रंगांनी समृद्ध अन्नपदार्थांचा आहारात समावेश करावा. मन आणि शरीर निरोगी ठेवण्यासाठी स्वतःवर प्रेम करणे आणि स्वतःची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.’’

## शब्दकोडे क्रमांक : १



**आडवे शब्द :** १. आशिया खंडातील एक देश ३. जमा-खर्चाची मोजदाद ६. आजार ८. प्रवाही पदार्थ (उदा. पाणी, तेल)१०. क्रिकेटमधील ६ चेंडूंचा संच १३. गुलाम किंवा सेवक १५. महाराष्ट्रातील एक जिल्हा १७. महिना १८. हिंदीत ‘बॉम्ब’ १९. मला २१. अमिताभ बच्चन, हेमा मालिनी यांचा एक हिंदी सिनेमा २३. घर किंवा निवासस्थान २४. जिथे अफजल खानाचा वध झाला तो किल्ला २६. खूप मोठा त्रास किंवा दुःख २७. भेग २९. गरीब ३०. बुद्धी किंवा विचारशक्ती ३२. वडील ३३. तलवार ३६. गाळून उरलेला कचरा ३७. हिंदीत - हिरवा ३८. पुरावा किंवा मोजमाप ३९. याचना ४२. तूप ४३. पूर्णपणे नाश होणे (धुळधाण) ४५. स्वराज्याची राजधानी असलेला किल्ला ४७. जंगल किंवा वन ४८. हिंदीत - आईचे किंवा वडिलांचे वडील ४९. चीनमधील एक प्रसिद्ध शहर ५१. दुधापासून बनवण्यात येणारे एक पाचक पेय ५२. लहान वस्ती ५३. लोकांचे मत

**उभे शब्द :** १. मनातील सुप्त इच्छा २. एखाद्याच्या गुणांची केलेली कदर ४. नागराज ५. कपाळावर आलेला केसांचा झुपका ७. औषधी झाडपाला कढवून तयार केलेला रस (काढा) ९. उणे ११. धनुष्य १२. एक केंद्रशासित प्रदेश - दीव ...फ्१४. समाजातील एकोपा १६. धूर्त १८. मानहानी २०. पूजाअर्चा २२. गाण्याची विशिष्ट शैली २३. चांगले २४. हुबेहूब नक्कल २५. ‘डाग’ - उलट लिहा २६. अंतराळात जाणारे वाहन २८. कणीस २९. पतीचा भाऊ ३१. नजर ३२. तान्हुले मूल ३३. रियाज ३४. शेतमाल उगवण्यासाठी करावी लागते ती (पेरणी/मशागत) ३५. आपल्या अवतीभवतीचा परिसर ३६. हवेतील थंडावा ३७. जिवंत ३९. महत्त्वाचा ४०. घट्ट मैत्री ४१. येणे ४४. तारणहार ४६. एका मुलीचे नाव ४८. बर्मुडा बांधायची कमरेची दोरी ५०. हवन


आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### कै. विजया शिवलकर आंतरशालेय योगासन स्पर्धेचे ११ जुलै रोजी आयोजन



अहिल्यानगर - मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून २१ जून हा दिवस संपूर्ण जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संस्कृती व शास्त्रपरंपरेतील योगाचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये योगाची आवड निर्माण व्हावी, तसेच शालेय जीवनातच निरोगी व संतुलित जीवनशैलीची पायाभरणी व्हावी या उद्देशाने कै. विजया (ताई) शिवलकर आंतरशालेय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष असून, शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी ही स्पर्धा उत्साहात पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. शालेय जीवनात विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडणघडण होत असते. योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास साधण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या माध्यमातून केला जात आहे. स्पर्धा इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते नववी अशा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमासाठी योग विद्या धाम, अहिल्यानगर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. स्पर्धेचे ठिकाण पालवी शिशुविहार, शुभमंगल कार्यालय, भिडे हॉस्पिटलसमोर, सावेडी नाका, अहिल्यानगर असे असून, शहर व परिसरातील जास्तीत जास्त शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धेबाबत अधिक माहिती व नावनोंदणीसाठी ९८९०००१८४० अथवा ९०११५६८५६७ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असेही आयोजकांनी कळविले आहे.

### शासकीय अहवालात उघड चिखली येथील पांढरवाळ तलावातून सरपंचाने केला मुरूम उपसा व अतिक्रमण



अहिल्यानगर- मौजे चिखली येथील पांढरवाळ पाझर तलावातून (गट नं. ४७०) तत्कालीन प्रशासक तथा विद्यमान सरपंच कुलदीप पांडुरंग कदम यांनी मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर मुरूम उपसा केल्याची आणि तलाव क्षेत्रात अतिक्रमण केल्याची धक्कादायक बाब शासकीय स्तरावर उघडकीस आली आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत स्थळ पाहणी अहवालात या बेकायदेशीर कृत्यावर आणि अतिक्रमणावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.चिखली येथील पांढरवाळ पाझर तलावात शासकीय नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर उत्खनन आणि मुरूम चोरी होत असल्याबाबत गावातील सुजाण नागरिक महेश झेंडे यांनी आपले सरकार पोर्टलवर पुराव्यांसह अधिकृत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग (श्रीगोंदा) यांच्या पथकाने पांढरवाळ पाझर तलावाची प्रत्यक्ष जागेवर जाऊन शासकीय पाहणी केली.या शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत पांढरवाळ तलावाच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर मुरूम उपसल्याचे व तलाव क्षेत्रात बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचे अधिकृतरीत्या आढळून आले आहे. विशेष म्हणजे, या उत्खननामागे राहू फाउंडेशन या सामाजिक संस्थेचे नाव पुढे केले जात होते. मात्र, राहू फाउंडेशनने प्रशासनाला लेखी खुलासा देऊन पांढरवाळ तलावात (गट नंबर ४७०) कोणतेही काम केले नसल्याचे स्पष्ट केले असून संस्थेने केवळ उपळी पाझर तलावात काम केल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सरपंच कुलदीप कदम यांनीच पांढरवाळ तलावात हे बेकायदेशीर उत्खनन करून शासकीय मालमत्तेची लूट केल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

# लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगरच्या अध्यक्षपदी हरजितसिंह वधवा

### सचिवपदी हरिश हरवानी तर खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जागतिक स्तरावर सेवाभावी कार्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, अहिल्यानगरच्या वर्ष २०२६–२७ साठीच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, अध्यक्षपदी हरजितसिंह वधवा, सचिवपदी हरिश हरवानी आणि खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे.

लायन्स क्लब ही २१० हून अधिक देशांमध्ये सुमारे १५ लाख सदस्यांच्या माध्यमातून कार्यरत असलेली जगातील अग्रगण्य सेवाभावी संस्था आहे. लायन्स क्लब ऑफ अहमदनगरनेही शहरात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, युवक विकास, नेत्रतपासणी, आपत्ती निवारण तसेच वंचित घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले आहेत.

कोरोना महामारीच्या काळात क्लबने 'घर घर लंगर सेवा' उपक्रमाद्वारे हजारो नागरिकांपर्यंत अन्नसेवा पोहोचवून उल्लेखनीय कार्य केले. तसेच मागील वर्षभरात कन्यादान, महिला सक्षमीकरण, युवतींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण, गरजू मुलींना सायकल वाटप, आरोग्य तपासणी शिबिरे आणि विविध समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. या उत्कृष्ट कार्याची दखल लायन्स इंटरनॅशनलने घेऊन क्लबला विविध पुरस्कारांनी गौरविले आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष हरजितसिंह वधवा हे एमआयडीसीतील उद्योजक असून गेली अनेक वर्षे औद्योगिक क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. ते एच ॲण्ड जे असोसिएट्स या औद्योगिक संस्थेचे प्रमुख असून, गुरू अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून 'घर घर लंगर सेवा', शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि गरजूंसाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहेत. त्यांनी यापूर्वीही लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची यशस्वी धुरा सांभाळली असून, क्लबमधील अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक नाविन्यपूर्ण आणि समाजाभिमुख प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत.

नवनिर्वाचित सचिव हरिश हरवानी हे लायन्स चळवळीतील अनुभवी आणि कार्यक्षम पदाधिकारी म्हणून ओळखले जातात.

# संचेती हॉस्पिटल तर्फे डॉ.के.एच.संचेती मेडी रत्न पुरस्काराची स्थापना;पहिला पुरस्कार डॉ.कल्याण एम. गंगवाल यांना प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** संचेती हॉस्पिटल तर्फे डॉ.के.एच.संचेती मेडी रत्न पुरस्काराची स्थापना करण्यात आली आहे. हा पुरस्कार मेडीजैन कम्युनिटीच्या सहकार्याने सुरू करण्यात आला आहे. वैद्यकीय सेवेच्या पलीकडे जाऊन समाजावर अर्थपूर्ण व दीर्घकालीन प्रभाव निर्माण करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्यासाठी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.

नुकतेच झालेल्या राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त याअंतर्गत पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत पहिला पुरस्कार फिजिशियन डॉ. कल्याण मोतीलालजी गंगवाल यांना प्रदान करण्यात आला. डॉ.कल्याण गंगवाल हे प्रतिष्ठित वैद्यकीय तज्ञ असून कॅरियम हॉस्पिटल, पुना हॉस्पिटल आणि ससून हॉस्पिटल यांसारख्या नामांकित संस्थांशी त्यांची कारकीर्द जोडलेली आहे.

या पुरस्कार सोहळ्याला दर्शन आय केअर सेंटरचे संस्थापक व वरिष्ठ नेत्रशल्यचिकित्सक आणि मेडिजैनचे आश्रयदाता डॉ.जिग्नेश तसवाला, संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स चे अध्यक्ष डॉ. पराग के.संचेती, मेडिजैनचे आश्रयदाता व फॅमिली फिजिशियन डॉ. पराग जैन, मानद अध्यक्ष आणि कॉस्मेटोलॉजिस्ट व त्वचारोगतज्ज्ञ डॉ.ज्योती संघवी, मानद सचिव व फॅमिली फिजिशियन डॉ.सोनल पालरेचा, मानद खजिनदार व वरिष्ठ दंतचिकित्सक आणि कॉस्मेटोलॉजिस्ट डॉ. आरती भटेवरा आणि संचेती हॉस्पिटलच्या होम हेल्थकेअर व संपर्क विभागाच्या संचालिका रूपल संचेती,अर्चना संचेती, संचेती ॲडव्हान्स्ड आर्थोकेअर हॉस्पिटलचे प्रमुख यशवंत शिवण्णा तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती आदी मान्यवर उपस्थित होते.

संचेती ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स चे अध्यक्ष डॉ. पराग के.संचेती म्हणाले की,माझ्या वडिलांनी संचेती हॉस्पिटलची स्थापना हीरुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या एका साध्या पण मोलाच्या विचारावर केली. त्यांनी आम्हाला नेहमीच हे शिकवले की, डॉक्टरांचे कर्तव्य हे केवळ रुग्णालयाच्या दारापर्यंत मर्यादित नसते.आजही ते रूग्णालयात येतात तेव्हा त्यांचे मोलाचे मार्गदर्शन सर्वांना करत असतात. ज्यांचे कार्य केवळ उपचारांपुरते मर्यादित नसून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवणारे आहे, अशा डॉक्टरांचा डॉ.के.एच.संचेती मेडी रत्न पुरस्काराने गौरव केला जातो. डॉ. कल्याण गंगवाल यांनी आपल्या कार्यातून उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. या पुरस्काराचे पहिले मानकरी म्हणून डॉ. कल्याण गंगवाल हे योग्य व्यक्ती आहेत,असा आमचा ठाम विश्वास आहे.

यावेळी मेडीजैनच्या अध्यक्ष डॉ. ज्योती संघवी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. वैद्यकीय सेवेच्या पलीकडे जाऊन समाजावर सकारात्मक प्रभाव निर्माण करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांचा सन्मान होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# महावितरण विरोधात खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा

### स्मार्ट मीटरची सक्ती खपवून घेणार नाही; वाढीव वीजबिले रद्द करा, अन्यथा तीव्र आंदोलन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महावितरणच्या कथित गलथान कारभाराविरोधात तसेच शेतकरी व सर्वसामान्य ग्राहकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर येथे शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात आला. वाढीव वीजबिले, अघोषित भारनियमन, स्मार्ट मीटरची सक्ती, ट्रान्सफॉर्मर बदलण्यास होणारा विलंब, सोलर योजनेतील गैरप्रकार आणि अधिकाऱ्यांच्या अरेरावीविरोधात शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत महावितरण प्रशासनाला निवेदन सादर केले.

यावेळी बोलताना खासदार निलेश लंके म्हणाले, राज्य सरकार एका बाजूला स्मार्ट मीटरची सक्ती नसल्याचे सांगत असताना दुसऱ्या बाजूला शहर व ग्रामीण भागात नागरिकांवर दबाव टाकून स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. हा प्रकार तातडीने थांबवावा. जिल्ह्यात कुठेही जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवू देणार नाही. जनतेच्या प्रश्नांसाठी प्रसंगी तीव्र आंदोलन उभारण्यासह जेलमध्ये जाण्याचीही तयारी असल्याचा इशारा त्यांनी दिला.

महावितरणच्या अधीक्षक अभियंता विजयकुमार पवार यांना निवेदन देताना खासदार लंके यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. काही अधिकारी व कर्मचारी पैसे घेतल्याशिवाय काम करत नसल्याच्या तक्रारी सातत्याने येत असून, तक्रारदारांशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सिंगल फेज योजना नसलेल्या गावांना तातडीने वीजपुरवठा द्यावा आणि प्रलंबित तक्रारी निश्चित कालमर्यादेत निकाली काढाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

महावितरणच्या निष्काळजीपणामुळे श्रीगोंदा तालुका व नगर शहरात निष्पाप नागरिकांचा जीव गेल्याचा उल्लेख करत संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी आणि कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

शेवगाव तालुक्यात बांबूच्या आधारावर वीजतारा ओढण्यात आल्याचे प्रकार तसेच नगर शहरातील अनेक भागांमध्ये उघड्या अवस्थेतील डीपीमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचा मुद्दा उपस्थित करत पावसाळ्यात दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मोर्चादरम्यान शेतकऱ्यांनी वाढीव वीजबिले कमी करणे, ग्रामीण भागातील अघोषित भारनियमन बंद करणे, जळालेले ट्रान्सफॉर्मर त्वरित बदलणे, नुकसानग्रस्त पोल व वीजतारा दुरुस्त करणे, डीपीअभावी पिकांचे होणारे नुकसान टाळणे, महावितरणचे साहित्य उपलब्ध करून देणे, सोलर योजनेतील प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, अतिरिक्त पैशांची मागणी करणाऱ्या एजन्सींवर कारवाई करणे आणि अंदाजे रीडिंगऐवजी प्रत्यक्ष मीटर रीडिंग घेण्याची व्यवस्था सुरू करणे, अशा विविध मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.



**प्रभाग समिती ३मध्ये मंगल गेट मटन मार्केट, मासेवाले रोडवर बसून वाहतुकीस अडथळा तरी सर्वांना रोड वरून हटविण्यात आले तसेच रोड लगत कोंबड्यांचे पिंजरे पात्र्याचे शेड टापऱ्या इतर अतिक्रमणे काढण्यात आली. प्रभाग अधिकारी श्री श्याम गोडळकर साहेब अतिक्रमण पथक उपस्थितीत काम सुरू आहे.**

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाला मंजुरी देऊन लागू करावा

### अन्यथा १६ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल मातंग समाजाचा मोर्चा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने तातडीने निर्णय घेऊन तो लागू करावा, अन्यथा १६ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सकल मातंग समाज महाराष्ट्राच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आला.

पत्रकार परिषदेत सांगण्यात आले की, दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकारांना असल्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. या निर्णयामुळे सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मातंग समाजाला नोकरी, शिक्षण तसेच विविध शासकीय योजनांमध्ये अपेक्षित प्रतिनिधित्व मिळालेले नसल्याने सन १९८० पासून उपवर्गीकरणाची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. सन २०२२ पासून विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष आणि समाजातील मान्यवरांनी एकत्र येत सकल मातंग समाज महाराष्ट्राच्या माध्यमातून हा लढा अधिक व्यापक केला. याअंतर्गत जवाब दो आंदोलन, दवंडी आंदोलन' आणि 'जनआक्रोश महाआंदोलन' यांसारखी आंदोलनेही करण्यात आली. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी निवृत्त न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समितीची स्थापना केली होती. समितीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून, इतर राज्यांतील उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेचा आढावा घेतला तसेच आवश्यक माहिती व तथ्यांचे संकलन करून मार्च २०२६ मध्ये शासनाला अहवाल सादर केला.

यानंतर शासनाने मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून अहवालावर विविध समाजघटकांकडून सूचना व हरकती मागविल्या. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी शासनाने चालू पावसाळी अधिवेशनात अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा निर्णय घेऊन तो तात्काळ लागू करावा, लाभवंचित समाजघटकांना अतिरिक्त मागासलेपणाचा हक्क द्यावा तसेच आरक्षणातील अनुशेष बॅकलॉक भरून काढावा, अशी मागणी करण्यात आली. शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा १६ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर शहरातील लहुजी वस्ताद साळवे चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली.

या पत्रकार परिषदेला भारतीय दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुनील उमाप, उद्योगपती विजय वडागळे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत घोरपडे, मनपा पतसंस्थेचे व्हाइस चेअरमन गुलाब गाडे, सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ वडागळे, विनोद शिरसाठ, अभिजीत वैराळ, गणेश भालेराव, चंदूभाऊ काळोखे, राहुल भारस्कर, पावलस पवार, पंडित वाघमारे, गणेश घोरपडे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भक्तिभावाच्या वातावरणात भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सवाचे आयोजन

### श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे भाविकांना उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढ शुद्ध द्वितीयेचे औचित्य साधत श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सव गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.

शहरातील लालटाकी रोड येथील श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट येथून भगवान श्री जगदीश यांच्या रथयात्रेला प्रारंभ होणार असून, आकर्षक सजविलेल्या रथात विराजमान भगवान श्री जगदीशांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. भजन, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात ही रथयात्रा संपन्न होणार आहे.या पवित्र सोहळ्याचे यजमान श्री सत्यनारायणजी गोवर्धनजी झंवर हे असून, श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे अध्यक्ष तथा विश्वस्त दीपक काबरा यांनी सर्व समाजबांधव, नागरिक आणि भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून भगवान श्री जगदीश यांचे दर्शन घ्यावे व रथयात्रा महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

आषाढ महिन्यातील या पवित्र धार्मिक सोहळ्यामुळे परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघणार असून, भगवान श्री जगदीश यांच्या कृपाशीर्वादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांचे तातडीने सर्व्हेक्षण करा – ना.विखे पाटील



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महसूल आणि जलसंपदा विभागाने एकत्रित सर्व्हेक्षण करून एक महीन्यात प्रस्ताव सादर करण्याचा सूचना जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जायकवाडी प्रकल्पात पुर्नवसित झालेल्या शेवगाव नेवासा आणि गंगापूर तालुक्यातील गावांच्या समस्याबद्दल मंत्रालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.बैठकीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील,आ.मोनिका राजळे आ.रमेश बोरनारे आ.विठ्ठलराव लंघे आ.अक्षय कर्डीले जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्यासह जलसंपदा आणि मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पुर्नवसित गावात बुडीत क्षेत्र किती आहे.असलेल्या किती जमीनीमध्ये पाणी जाते याबाबतचा ड्रोण सर्व्हे करून घेण्याचे सूचित करून,जलसंपदा व महसूल विभागाने गावांमध्ये जनसुनावणी घेवून ज्यांच्या जमीनी आहेत त्या शेतकऱ्यांची माहीती महीना भरात संकलित करून त्याचा प्रस्ताव शासनाने पाठवावा.

जमीन अदलाबदल, भोगावटा वर्ग एक करणे,तसेच पुर्नवसित गावात नसलेल्या सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घ्यावा यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले.मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी जमीनीचा सर्व्हे आल्यानंतर त्या गावातील प्रश्नाच्या संदर्भात निर्णय करण्याची ग्वाही दिली. शेतकऱ्यांच्या समस्या मांडतांना आ.मोनिका राजळे यांनी जायकवाडी प्रकल्प आधी झाला.त्यानंतर झालेल्या कायद्यामुळे शेतकऱ्यांची मोठी समस्या निर्माण झाल्याचे सांगितले.आ.विठ्ठलराव लंघे यांनी पुर्नवसित गावांच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.या गावांना न्याय मिळेल असे निर्णय व्हावेत आशी अपेक्षा व्यक्त केली.

# संत एकनाथ महाराज पालखीतील वारकऱ्यांना आमदार विलास भुमरे यांच्या संकल्पनेतून ६ हजार रेनकोटचे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दक्षिण काशी पैठण येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या शांतीब्रह्म संत एकनाथ महाराजांच्या पवित्र पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी आमदार विलास पाटील भुमरे यांच्या संकल्पनेतून ६ हजार रेनकोटचे वाटप करण्यात आले.

हातगाव येथील मुक्काम आटोपून पालखी बोधेगावकडे प्रस्थान करत असताना आयोजित कार्यक्रमात संत एकनाथ महाराज दिंडीचे शिवराज भैय्या भुमरे यांच्या हस्ते वारकऱ्यांना रेनकोटचे वितरण करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि अखंड सुरू राहावा, या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे दर्शन घेऊन वारकऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. पालखीतील मानकरी,



दिंडी प्रमुख आणि वारकऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत करत आमदार विलास पाटील भुमरे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमास डॉ. भारत झारगड, संतोष बोटे, विजय सुते यांच्यासह पालखीतील मानकरी, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार विलास पाटील भुमरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पावसाळी वारीत वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

# धक्कादायक..शिर्डीत गाळा भाडोत्री देण्याच्या बहाण्याने महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** शिर्डीत गाळा भाड्याने देण्याच्या बहाण्याने महिलेचा विनयभंग केल्याच्या तक्रारीवरुन दिलीप रामभाऊ गोंदकर याच्याविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

गाळा आणि रूम भाड्याने देण्याच्या बहाण्याने एका ३४ वर्षीय महिलेला बोलावून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना शिर्डी येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून दिलीप रामभाऊ गोंदकर रा. शिर्डी, ता. राहाता याच्याविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पीडित महिला तीन महिन्यांपूर्वी शिर्डी येथे आली असताना तिने गाळा भाड्याने देणे असल्याबाबतचे एक पोस्टर पाहिले होते व त्यावरील संपर्क क्रमांक घेतला होता. त्यानंतर ४ जुलै २०२६ रोजी गाळ्याची आवश्यकता असल्याने तिने त्या क्रमांकावर संपर्क साधला. फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने आपले नाव दिलीप रामभाऊ गोंदकर असे सांगितले आणि ८,००० रुपये भाडे व ५०,००० रुपये डिपॉझिट असल्याचे सांगितले. त्यानंतर महिला गाळा पाहण्यासाठी शिर्डी येथे आली. यावेळी दिलीप गोंदकर याने तिला गाळा दाखवला.



तेव्हा महिलेने आपल्याला मुलांसह राहण्यासाठी गाळा किंवा रूम पाहिजे असल्याचे सांगितले. यानंतर त्यांच्यात फोनवर बोलणे सुरू होते. ७ जुलै २०२६ रोजी गोंदकर यांनी महिलेला शिर्डी येथे बोलावून घेतले. दुपारी दिड वाजेच्या सुमारास महिला शिर्डी येथील एका हॉटेलच्या डेअरीजवळ पोहोचली. तिथे डेअरीच्या गाळ्यामध्ये बोलत असताना दिलीप गोंदकर याने महिलेला विचित्र स्पर्श करण्यास सुरुवात केली. महिलेने यास विरोध करत मला गाळा किंवा रूम दाखवा असे म्हटले.

त्यानंतर रूम दाखवण्याच्या बहाण्याने महिलेला डेअरीच्या मागील हॉटेलमधील एका रूममध्ये घेऊन गेला. तिथे त्याने महिलेला मिठी मारून, तिच्या शरीराला स्पर्श करत लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. महिलेने त्याला तात्काळ विरोध केला आणि पोलिसात तक्रार करण्याची ताकीद दिली. त्यावर तिला पोलिसात किंवा घरी न सांगण्यासाठी पैशांचे आमिष दाखवण्यास सुरुवात केली.

त्याच वेळी महिलेच्या ओळखीच्या काही मैत्रिणी तिला शोधत हॉटेलमध्ये आल्या. महिलेने घडलेला सर्व प्रकार आपल्या मैत्रिणींना सांगितला आणि त्यानंतर सर्वांनी मिळून थेट शिर्डी पोलीस स्टेशन गाठले. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून शिर्डी पोलिसांनी दिलीप रामभाऊ गोंदकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (), २०२३ च्या कलम ७५(१) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# ‘२० शेळ्या’ हा कोडवर्ड वापरून २० हजारांची मागणी? कोपरगावात कथित पत्रकारावर गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** कोपरगाव तालुक्यातील एका प्रकरणाने सध्या खळबळ उडाली आहे. स्वतः ला पत्रकार आणि सामाजिक संघटनेचा सदस्य असल्याचे सांगणाऱ्या व्यक्तीवर एका शेतकऱ्याकडून २० हजार रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. एवढेच नाही तर, पैसे न दिल्यास बातम्या चालविणे, सरकारी कारवाई घडवून आणणे आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचाही दावा फिर्यादीने आपल्या तक्रारीत केला आहे.

सविस्तर वृत्त :

सांगवी भुसार येथील शेतकरी अजय किसन जाधव यांनी कोपरगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, कोळगाव थडी येथील मतीन बाबुलाल शेख याने गेल्या काही दिवसांपासून त्यांच्याशी वारंवार फोन आणि व्हॉट्सअॅप कॉलद्वारे संपर्क साधला. फिर्यादीनुसार, ‘‘तू गोदावरी नदीपात्रातून वाळू वाहतूक करतोस. तुझे फोटो आणि व्हिडिओ माझ्याकडे आहेत. तहसीलदारांकडे तक्रार करीन आणि तुझ्या विरोधात बातम्या प्रकाशित करीन,‘‘ असे सांगत दबाव टाकण्यात आला. त्यानंतर कथितरित्या २० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. विशेष म्हणजे, या व्यवहारासाठी ‘‘२० शेळ्या‘‘ असा कोडवर्ड वापरण्यात आल्याचा उल्लेखही फिर्यादीत करण्यात आला आहे. फिर्यादीच्या मित्रांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, १० हजार रुपये नाकारून २० हजार रुपयांवर ठाम राहिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, पैसे न मिळाल्यानंतर संबंधित व्यक्तीने त्यांच्या विरोधात सोशल मीडियावर बातम्या प्रसारित करण्यास सुरुवात केली. तसेच पुढे व्हॉट्सअॅप कॉल करून ‘‘आता तुला पैसे द्यावेच लागतील, नाहीतर तुझ्यावर कारवाई होईल. तुझा ट्रॅक्टर पलटी करून टाकू,‘‘ अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या सर्व संभाषणांचे काही कॉल रेकॉर्डिंग आपल्या ताब्यात असल्याचा दावा करत फिर्यादीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणामुळे पत्रकारितेच्या नावाचा गैरवापर होत असल्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मात्र, या प्रकरणातील सर्व आरोप हे फिर्यादीच्या तक्रारीवर आधारित असून, संबंधित व्यक्तीची बाजू अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे पोलीस तपासानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे शनिवारी मार्केट यार्ड येथे भव्य स्वागत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीनिमित्त राज्यभरातून वारकरी पायी दिंडीने पंढरपूरकडे रवाना होत आहेत. पांडुरंगाच्या दर्शनाच्या ओढीने वारकरी दरवर्षी वारी करीत असतात. अहिल्यानगर शहरातून दरवर्षीप्रमाणे यंदाही त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ महाराजांचा पालखी सोहळा व दिंडी पंढरपूरकडे मार्गक्रमण करणार आहे. हा पालखी सोहळा शनिवारी सायंकाळी ५ वाजता अहिल्यानगर शहरातील मार्केट यार्ड येथे मुक्कामी असणार आहे. या दिंडीतील वारकऱ्यांचे सालाबाद प्रमाणे भव्य स्वागत करण्यात येणार आहे, अशी माहिती मार्केट यार्ड मित्र मंडळाचे अध्यक्ष अमोल पोखरणा यांनी दिली.




संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे दरवर्षी मार्केट यार्ड मित्र मंडळाच्यावतीने स्वागत करण्यात येते. यंदाही या दिंडीचे फटाक्यांची आतषबाजी, फुलांची आकर्षक सजावट, मावळ येथील ढोल पथकाचे वादन, तुतारी वादक, नेवासा येथील हलगी पथकाच्या निनादात स्वागत करण्यात येणार आहे. दिंडीतील सर्व वारकऱ्यांसाठी तसेच दर्शनासाठी येणाऱ्या जवळपास १२ हजार भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# नाथसागरावरील अधिकारी बोलतात एक, करतात वेगळेच; शेतकऱ्यांचा संताप

**पैठण–** जायकवाडी प्रकल्पाच्या नाथसागरातून पावसाळ्यात पाणी सोडण्याच्या नियोजनावर शेतकरी व सामाजिक कार्यकर्त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. नियोजनाअभावी गोदावरीला वारंवार पूर येऊन शेतपिकांचे व गावांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप करत, ‘‘अधिकारी बोलतात एक आणि करतात वेगळेच,‘‘ अशी टीका करण्यात आली आहे.

मागील वर्षीच्या पूरप्रकरणाची केंद्रीय जल आयोगामार्फत चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, बाधित शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई द्यावी, तसेच पावसाळी सत्रात नाथसागरावर जलतज्ज्ञ, जलमित्र व जलअभ्यासकांचे पथक नियुक्त करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विष्णू ढवळे , रमेश लिंबोरे, दिनेश



पारीख, कैलास तवार, किरण काळे, अशोक औटे, शेखर पाटील, अंबादास ढवळे आदींनी केली आहे.

दरम्यान, पावसाळी सत्र सुरू होऊनही पूरनियोजनाबाबत संबंधित विभाग, शेतकरी व सामाजिक संघटनांची समन्वय बैठक प्रशासनाने न घेतल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली.

# गांजा विक्री प्रकरणातील मुख्य आरोपीचा अटकपुर्व जामीन मंजूर..

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पारनेर पो. स्टे. येथे गुन्हा रजि. नं. ३७१/२०२६, दि. १७/५/२०२६ या गुन्ह्यात पोलीसांनी टाकळी ढोकेश्वर दुरक्षेत्र हद्दीत, चारणवाडी कातळवेढा, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथे त्यांना प्राप्त झालेल्या गोपनीय खबरीनुसार



छापा टाकला असता पोलीसांना सदर ठिकाणी एका अल्टो कार वाहनामध्ये ४२.५०० किलो ग्रॅम गांजा मिळून आला. सदर घटनेच्या तपासात पोलीसांनी रु. ११ लाख १२ हजार रुपये किंमतीचा गांजा, वाहन इत्यादी जप्त केले व सदर गुन्ह्यात एकुण चार आरोपी इसम यांचे विरुद्ध वर नमुद गुन्हा बी. एन. एस. कलम ८ (सी) व अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ कायदा (एन.डी.पी.एस.) कलम २० (बी) (२) (सी) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्यातील गांजा मिळून आलेली गाडीचा मालक मुख्य आरोपी हा घटनास्थळाहुन पसार झाला.

त्यानंतर सदर गुन्ह्यातील मुख आरोपी याने अटकपूर्व जामीन मिळणेसाठी मा. जिल्हा न्यायालय अहमदनगर येथे अटकपूर्व जामीन दाखल केला. सदर मुख्य आरोपी याचे बचावासाठी आरोपीचे वकीलांनी प्रभावी व मुद्देसुद युक्तीवाद करुन मा. न्यायालयास निदर्शनास आणुन दिले की, जप्त मुद्देमाल हा आरोपीचे ताब्यातून जप्त केलेला नाही व आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही. सदरयुक्तीवाद मा. न्यायालयाने ग्राह्य धरुन सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपीस अटकपुर्व जामीन मंजुर केला.

आरोपी तर्फे अहिल्यानगर येथील प्रसिद्ध वकील अॅड. एम. बी. तवले, अॅड. संजय दुशिंग, अॅड. सतिश गिते यांनी कामकाज पाहिले व त्यांना अॅड. अश्विनी गिते, अॅड. माधुरी नानेकर यांनी सहकार्य केले.

(पान १ वरून)

## महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या हालचाली सुरु

केली होती. त्यानुसार, समान नागरी कायद्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात जणांची कमिटी तयार करण्यात येत आहे, अशी माहिती आशिष शेलार यांनी दिली.

दरम्यान, समान नागरिक कायद्यासाठी सात जणांची समिती तयार करण्यात आली असून डिसेंबरच्या अधिवेशनात याबाबतचा अहवाल तयार केला जाईल आणि दोन्ही सभागृहात हे विधेयक मांडण्यात येईल, असेही आशिष शेलार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## भगूर येथे मावा व सुगंधित तंबाखू जप्त

साहाय्याने मावा तयार करत असल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी तत्काळ सदर ठिकाणी छापा टाकून

संकेत कडुबाळ गरूड (वय २३, रा. भगूर) याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, तो फरार आरोपी नितीन ज्ञानदेव पुरणाळे याच्या सांगण्यावरून हा मावा तयार करत असल्याची कबुली त्याने दिली.

या कारवाईत पोलिसांनी मावा तयार करण्याचे साहित्य व मशीन असा एकूण एक लाख २२ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शेवगाव पोलीस करत आहेत.

## राष्ट्रपुरुषांविषयी आक्षेपार्ह मजकूर पसरवणारा १२ तासांत गजाआड

शेवगाव विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी, सायबर पोलीस ठाणे अहिल्यानगर आणि पाथर्डी पोलिसांनी युद्धपातळीवर तपास करीत सायबर सेलच्या मदतीने पोलिसांनी सूरज वांढेकर याला निष्पन्न करून ताब्यात घेतले.

## श्री क्षेत्र शिर्डी ते पंढरपूर पायी पालखी सोहळा; श्री साई संस्थान आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने भव्य सुरुवात

व पांडुरंग चरणी प्रार्थना केली. यावेळी श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी महंत काशिकानंदजी महाराज यांचा शाल देत सत्कार केला व आनंददायी प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या तर महंत काशिकानंदजी महाराज यांनी उपस्थित मान्यवरांचा शाल देत सत्कार केला व आभार मानले. यावेळी महंत काशिकानंदजी महाराज, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे,शिवसेना जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार, ग्रीन अँड क्लीन चे अजित पारख, मणिलाल पटेल यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एल्गार

यावेळी आंदोलकांनी राज्य शासनाच्या शिक्षणविषयक धोरणांमुळे शिक्षकांचे मानसिक, शारीरिक आणि व्यावसायिक खच्चीकरण होत असल्याचा आरोप केला. शासन सातत्याने शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करत असून, वारंवार लोकशाही मार्गाने निवेदने, बैठका आणि पाठपुरावा करूनही कोणताही सकारात्मक निर्णय घेतला जात नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदवला.

समन्वय समितीच्या निवेदनात नमूद करण्यात आले की, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या सेवेशी संबंधित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. शासनाचे अलीकडील निर्णय शिक्षकांसाठी अत्यंत जाचक ठरत असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवरही होत आहे.

१४ मे २०२६ रोजी शिक्षण संचालकांनी विस्तार अधिकारी (शिक्षण), केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया सुरू करण्याबाबत काढलेले पत्र तातडीने रद्द करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. या पत्राच्या आधारे ज्या जिल्ह्यांमध्ये पदोन्नती प्रक्रिया पार पडली असेल तीही रद्द करून नव्याने न्याय्य निकषांवर प्रक्रिया राबवावी, अशी भूमिका शिक्षकांनी मांडली.

सन २०१० पूर्वी सेवेत रुजू झालेल्या आणि अनेक वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्याची सक्ती अन्यायकारक असल्याचे आंदोलकांनी सांगितले. तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही कार्यरत सेवाज्येष्ठ शिक्षकांना टीईटी नियमांत शिथिलता द्यावी किंवा त्यांच्यासाठी स्वतंत्र टीईटी परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने पात्रता पूर्ण करण्यासाठी दिलेल्या मुदतीच्या अधीन राहून सेवाज्येष्ठ व पात्र शिक्षकांना पदोन्नतीची संधी उपलब्ध करून द्यावी. १९ जानेवारी २०२६ रोजी शालेय शिक्षण विभागाने काढलेले पत्र रद्द करून नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार पदोन्नतीचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

१५ मार्च २०२४ रोजी लागू करण्यात आलेले संचमान्यता धोरण हे शिक्षण हक्क कायदा (आरटीई) तसेच १९८० च्या मूळ धोरणाशी विसंगत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या धोरणामुळे प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता निर्माण होणार असून ग्रामीण भागातील शाळांचे अस्तित्व धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. त्यामुळे हा अन्यायकारक जीआर तातडीने रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार इतर शासकीय कर्मचारी उपलब्ध नसतील तरच शिक्षकांची बीएलओ म्हणून नियुक्ती करावी. मात्र प्रत्यक्षात केवळ प्राथमिक शिक्षकांनाच मोठ्या प्रमाणात बीएलओची जबाबदारी दिली जात असल्याने त्यांच्या अध्यापनावर परिणाम होत आहे. त्यामुळे शिक्षकांना अशैक्षणिक कामातून पूर्णपणे मुक्त करून बीएलओसाठी इतर शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

शिक्षकांवर दिवसेंदिवस वाढत असलेल्या ऑनलाईन कामामुळे अध्यापनासाठी वेळ मिळत नसल्याची तक्रारही आंदोलनादरम्यान करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांना वर्गात अधिक वेळ देता यावा, यासाठी ऑनलाईन अहवाल, माहिती भरणे आणि इतर प्रशासकीय कामांचा भार कमी करावा, अशी मागणी करण्यात आली. शासनाने टीईटी, पदोन्नती, संचमान्यता, बीएलओची सक्ती, ऑनलाईन कामाचा वाढता भार यासह सर्व न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.